| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र पोलीस | पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर<br>तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)<br>दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६<br>Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ०८ /२०२३ दि. २० /०१/२०२४

## —: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

**ज्याअर्थी,** कल्याण डोंबिवली महानगरपालिका कार्यक्षेत्रात **डोंबिवली** वाहतूक उपविभागाचे हद्दीत आप्पा दातार चौक, डोंबिवली पूर्व येथे श्री गणेश मंदिर संस्थान तर्फे दि. २०/०१/२०२४ ते दि. २३/०१/२०२४ रोजी **'राम मंदिर प्राणप्रतिष्ठा'** निमित्त गायकांचे कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले आहेत. सदर कार्यक्रमास असंख्य भाविक व विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :—

**प्रवेश बंद —** ठाकुर्ली जोशी हायस्कूल समोरील रोडने आप्पा दातार चौक मार्गे फडके रोड कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **गणपती मंदिर गेटजवळ, नेहरू रोड** येथे व छेडा रोडने आप्पा दातार चौक मार्गे फडके रोड कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **तुळशी स्वीट कॉर्नर, छेडा क्रॉस रोड** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग —** ठाकुर्ली जोशी हायस्कूल समोरील रोडने आप्पा दातार चौक मार्गे फडके रोड कडे येणारी सर्व प्रकारची वाहने सरळ येवून टिळक रोडने मदन ठाकरे चौक येथून व छेडा रोडने आप्पा दातार चौक मार्गे फडके रोड कडे येणारी सर्व प्रकारची वाहने सरळ येवून टिळक रोडने मदन ठाकरे चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना दि. २०/०१/२०२४ रोजी रात्रौ २२:०० ते दि. २३/०१/२०२४ रोजी पहाटे ०१:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतुक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/— सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे

**<u>प्रत कार्यवाहीस्तव,</u>**

मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालीका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर

**<u>प्रत</u>** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

**<u>प्रत कार्यवाहीस्तव सविनय सादर,</u>**

मा. आयुक्त, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

**<u>प्रत</u>** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**<u>प्रत</u>** :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि डोंबिवली, कोळशेवाडी, कल्याण वाहतूक उपविभाग.